Time : 3 Hours

**MARATHI (T.L.)**

Subject Code

| S | 1 | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 52** **(Printed Pages : 10)** **Maximum Marks : 80**

***सूचना :—*** (*i*) प्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*ii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*iii*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

खालीलपैकी अचूक पर्याय लिहून पुढील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा. 3

1. जगात शील सर्वश्रेष्ठ आहे हे इंद्राला ............................ .

- बृहस्पतीकडून कळाले
- शुक्राकडून कळाले
- प्रल्हादाकडून कळाले
- लक्ष्मी कडून कळाले

2. लेखक ग. प्र. प्रधान यांनी अभिमन्यू असे ............................ .

- मेजर भास्कर रॉय यांना म्हटले आहे
- मेजर पूरी यांना म्हटले आहे
- कॅप्टन नायर यांना म्हटले आहे
- कुमक घेऊन जाणाऱ्या जवानाला म्हटले आहे

3. 19 डिसेंबर 1961 ह्या दिवशी गोव्याचे अंधकार युग समाप्त होऊन त्या जागी .............................. .

- सर्वत्र लख्ख प्रकाश देणारा सूर्य उगवला होता
- सूर्य क्षितिजाकडे घसरू लागला होता
- जनतेचे राज्य सुरू झाले
- स्वातंत्र्याचा सूर्य उगवला होता

खालील कोणतेही **दोन** उद्गार कोणी कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा : 2

4. "अभ्यास करा, परवचा म्हणा."

5. "बुडाला तर मासा, उडाला तर पक्षी."

6. "प्रश्न फार विचारले नाहीत, पण उत्तरे बरीच मिळाली."

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

7. मेजर रॉय यांना सैन्यात नसणारे लोक अधिक भाग्यवान असे का वाटतात ?

8. कुशाबा पाटील कोणत्या वाहनातून बसस्टॉप कडे येत होता ?

9. गावातील गणपती विसर्जनासाठी कोठे नेले जात होते ?

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील पाठाच्या लेखकाचे नाव लिहा : 1

10. जंगलाचं देणं :

- मारुती चितमपल्ली
- सौ. नंदा मडकईकर
- मधु मंगेश कर्णिक
- पं. महादेव शास्त्री जोशी

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील वाक्याच्या पाठाचे नाव लिहा : 1

11. धुळीच्या रस्त्यातून, शेतातून जीप धावताना असंख्य धक्के बसत होते :

- गाडेकार
- महावीरचक्रधारी मेजर भास्कर रॉय
- अमृताची वाट
- पेहलगाम

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **दोन** ते **तीन** वाक्यांत लिहा : 4

12. शिलावाचून मिळालेल्या संपत्तीचे फळ काय मिळते ?

13. गोकूळने वाण्याकडून सामान आणणे उद्यावर का टाकले ?

14. सदुभाऊच्या घरी लेखकाचे स्वागत कसे केले ?

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यांत लिहा : 6

15. रामजी खोडे शिवाजी राजांकडे तक्रार घेऊन का आला ?

16. गोपूने आईपेक्षा जास्त भात कसे मिळविले ?

17. लेखिकेला पेहलगामला भेटलेल्या छोट्या मुलीचे थोडक्यात वर्णन करा.

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून कवितेच्या ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 3

18. सर्व सांडूनी माझाई। ...............................

- ज्ञानदीप लावू जगी।।
- वाचे विठ्ठल रखुमाई।।
- तेथे राहू निरंतर।।
- तेची माझे रूप पूर्ण।।

19. शिरली घाटात, ..............................

- कोसळे दरीत
- धावसी मजेत
- घोटात गिळीत
- अफाट वेगात

20. पुसतात डाग तेही ..............................

- धर्मांध आक्रमाचे
- अतिगूढ संभ्रमाचे
- पावित्र्य संगमाचे
- देती पराक्रमाचे

खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 2

21. ढगात धुराचा फवारा सोडून ........... . गाडी ती बोलली माजून.

- विनवित
- क्रोधात
- गर्जत
- गर्वात

22. धागा अतूट हाच .......... . गुंतवावा.

- प्रेमात
- रक्तात
- जीवात
- प्राणांत

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

23. कोणाच्या संगतीने लोहाचे सुवर्ण होते ?

24. तुकाराम कोणाकोणास ऐकण्याची विनंती करत आहेत ?

25. तान्हे लेकरू कशात पडले ?

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **तीन** ते **चार** वाक्यांत लिहा : 6

26. कवी समाजरुपि ईश्वराची पूजा कशी करावयास सांगतात ?

27. समर्थ रामदासांच्या मते कोणकोणत्या गोष्टींची हयगय करू नये ?

28. कवी भा. रा. तांबे यांनी सायंकाळच्या वेळेचे वर्णन कसे केले आहे ?

खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्प्रचाराचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचाराचा योग्य वाक्यात उपयोग करा. 2

29. 
- मीठ मसाला पुरवणे.
- खडे फोडणे.

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा : 2

30. **राजे** सरळ पागे**कडे** गेले.

खालील वाक्य वर्तमानकाळात लिहा :

31. कुशाबाचे शेत मोठाले पण योग्य आखलेले होते. 1

32. खालीलपैकी कोणत्याही एका शब्दसमूहाबद्दल **एक** शब्द लिहा : 1

- सोन्याची अथवा चांदीची जर असलेला
- विश्रांती न घेता.

33. खालील कोणत्याही **दोन** शब्दांचे लिंग बदलून लिहा : 2

- वाघ
- मुलगी
- शिक्षक
- कोंबडा

34. खालीलपैकी कोणत्याही **दोन** शब्दांची वचने बदलून लिहा : 2

- रेडा
- मंदिर
- खोली
- पंखे

35. खालील कोणत्याही एका शब्दाचे विशेषण लिहा : 1

- अनुभव
- राष्ट्र

36. खालील कोणत्याही **एका** शब्दाचे भाववाचक नाम लिहा : 1

- श्रीमंत
- स्वच्छ

37. खालील कोणत्याही **दोन** शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 2

- दैत्य
- कलरव
- कयास
- सवड

38. खालील कोणत्याही **दोन** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 2

- सभ्य
- जड
- ओहोटी
- सुखी

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना कसे वागावे याबाबत आपल्या संस्कृतीने विविध प्रकारे मार्गदर्शन केले आहे. विद्यार्थ्यांचे आचरण कसे असावे यासंदर्भात विचारवंत आपली मते मांडत असतात. सुभाषितांमधूनही विद्यार्थ्यांमध्ये कोणते गुण असावेत याचे सुंदर वर्णन करण्यात आले आहे. त्यापैकी एका सुभाषितात सांगण्यात आले की, विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानतृष्णा, गुरुवरील निष्ठा, अध्ययनात दक्षता, एकाग्रता व महत्वाकांक्षा हे पाच गुण असले पाहिजेत. विद्यार्थ्याला ज्ञानाची सतत ओढ लागली पाहिजे. गुरुजनांवर

अखंड निष्ठा असली की ते शिकवत असलेल्या विषयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मनात आपोआप आवड निर्माण होते. विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासावर किंवा शिक्षणावर नेहमी लक्ष केंद्रित केले पाहिजे. मनाची एकाग्रता विचलित करणारी अनेक साधने विद्यार्थ्यांच्या जवळ असतात. मनाची एकाग्रता टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले कोणते ध्येय गाठायचे आहे, याची नेहमी जाणीव ठेवावी. विद्यार्थ्यांनी महत्त्वाकांक्षा बाळगून उच्च शिक्षण मिळवावे. त्या शिक्षणाच्या आधारे त्यांनी नोकरी किंवा उद्योग धंदा करताना समाजाचाही विचार करावा. प्रत्येक विद्यार्थी समाजाचा आधार बनला पाहिजे.

प्रश्न :

39. विद्यार्थ्याने एकाग्रता टिकवण्यासाठी कोणती जाणीव ठेवावी ?

40. विद्यार्थ्यांमध्ये कोणते पाच गुण असले पाहिजेत ?

41. विद्यार्थ्याला कशाची ओढ लागली पाहिजे ?

42. आपल्या गुरुजनांवर अखंड निष्ठा असली की काय होते ?

43. प्रत्येक विद्यार्थी कोणाचा आधार बनला पाहिजे ?

पुढील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

यंत्रामुळे वस्तुचे रूपांतर होते. कपड्यांच्या गिरणीत कापसाचे कापड बनते. कुंभार मातीला घटाचा आकार देतो. पिठाच्या गिरणीत धान्याचे पिठात रूपांतर होते. परंतु मूळ वस्तूत वाढ करण्याचे काम कोणतेच यंत्र करू शकत नाही. ते काम शेतकरी शेतीमधून करून दाखवतो. तो एक दाणा पेरतो व त्यातून शंभर दाणे काढतो. अशाप्रकारे मूळच्या वस्तूत वाढ करतो. रूपांतर नाही कारण शेवटी त्या गोष्टीचा संबंध निसर्गाशी आहे. मानवाची पहिली गरज ती भूक. ती शेतीमुळे भागते सर्व उद्योगधंद्याचा आधार म्हणजे शेती. जमिनीशी असलेला माणसाचा संबंध तुटला की जीवन विकृत बनते.

प्रश्न :

44. कापसाचे कापड कुठे बनते ?

45. माणसाचे जीवन विकृत केव्हा बनते ?

46. शेतकरी मूळ वस्तूत वाढ कशी करतो ?

47. यंत्र कोणते काम करू शकत नाही ?

48. वरील उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा.

49. मालक आणि नोकर यांच्यामध्ये झालेला संवाद **पाच** ते **सहा** ओळीत लिहा. 5

50. वेदांत/वेदा शेटये, 'शंकरनिवास' वरचा वाडा, कोरगाव, पेडणे–गोवा, हा/ही आपल्या लहान भावाला योगासनाचे महत्त्व पटवून देणारे पत्र लिहितो/लिहिते. सदर पत्राचा नमुना दहा ते पंधरा वाक्यांत लिहा. 5

51. खालील मुद्द्यांच्या आधारे सुमारे दहा ते पंधरा ओळीत गोष्ट लिहून तिला योग्य शीर्षक लिहा : 5

एका तळ्यातील पाणी सुकणे ........ कोल्ह्याने सर्व मासे संपविणे ....... शेवटी एका कासवावर दृष्टी पडणे ........ कोल्ह्याने गर्विष्ठपणे कासवाला खाण्याची धमकी देणे ........ कासवाने मान व पाय कवचात घेणे ........ कासवाला खाण्यासाठी कोल्ह्याने केलेले प्रयत्न फसणे ....... कासवाचे कोल्ह्याला सांगणे–''पाणी नसल्यामुळे माझे कवच सुकून एकदम टणक झाले आहे. पाण्यात सोडल्यास माझे कवच मऊ होईल व तुम्हाला खाणे सोपे होईल.'' ........ कोल्ह्याने कासवाला दुसऱ्या तळ्यात टाकणे ....... कासव पाण्यात पळून जाणे ....... कोल्ह्याला आपल्या मूर्खपणाचा पश्चाताप होणे.

**किंवा**

'शांतादुर्गा हायस्कूल' सांकवाळ येथे साजरा केलेल्या वार्षिक क्रीडामहोत्सवाचा वृतान्त खालील मुद्द्यांच्या आधारे सुमारे **दहा** ते **बारा** वाक्यांत लिहा.

दिनांक ........ प्रमुख पाहुणे ........ प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ........ क्रीडामहोत्सवाचे उद्‌घाटन ........ विविध कवायती व स्पर्धा ........ विजेत्या खेळाडूंना बक्षीस वितरण ........ प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील दोन प्रमुख मुद्दे ........ आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कोणी केले.

52. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **18** ते **20** ओळीत निबंध लिहा : 7

- विज्ञान प्रदर्शनात एक तास
- मोबाईलचे आत्मवृत्त
- प्रदूषण व पर्यावरण
- आवडता संत